**प्रकल्प प्रवर्तक मे. लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव, महाराष्ट्र यांच्या गट नं.६७,६८,६९,७०,८०,८३,८४ व ८५ (६७/१, ६७/२/३, ६८/१, ६८/२/१, ६८/२/२, ६८/३, ६८/४, ६९/१, ६९/२, ६९/३, ६९/४, ६९/५, ६९/६, ७०/२, ८०/४, ८३/९१/१, ८४/९२/२, ८४/९२/३, ८५/९३/१ व ८५/९३/२, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव - (४१३ ६०८), महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार क्षमता ६,०००.० टन प्रतिदिन वरुन १२,०००.० टन प्रतिदिन पर्यत वाढविणे (६,०००.० टन प्रतिदिन वाढ), सहनिर्मिती वीज/उर्जा प्रकल्प ३०.० मेगावॅट वरुन ३७.० मेगावॅट पर्यत वाढविणे (७.० मेगावॅट वाढ) आणि प्रस्तावित ऊसाचा रस/मोलॅसिसवर आधारित ४००.० किलोलिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव - ४१३ ६०८, महाराष्ट्र यांच्या गट नं.६७,६८,६९,७०,८०,८३,८४ व ८५ (६७/१, ६७/२/३, ६८/१, ६८/२/१, ६८/२/२, ६८/३, ६८/४, ६९/१, ६९/२, ६९/३, ६९/४, ६९/५, ६९/६, ७०/२, ८०/४, ८३/९१/१, ८४/९२/२, ८४/९२/३, ८५/९३/१ व ८५/९३/२, मुक्काम

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE • DHARASHIV •



Scanned with OKEN Scanner

पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव - ४१३ ६०८, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार क्षमता ६,०००.० टन प्रतिदिन वरुन १२,०००.० टन प्रतिदिन पर्यत वाढविणे (६,०००.० टन प्रतिदिन वाढ), सहनिर्मिती वीज/उर्जा प्रकल्प ३०.० मेगावॅट वरुन ३७.० मेगावॅट पर्यत वाढविणे (७.० मेगावॅट वाढ) आणि प्रस्तावित ऊसाचा रस/मोलॅसिसवर आधारित ४००.० किलोलिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थान - मे. लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री परमेश्वर व्ही. कांबळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. शोभा जाधव, अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV



Scanned with OKEN Scanner

जिल्हादंडाधिकारी, धाराशिव तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री मनिष होळकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV



Scanned with OKEN Scanner

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए - साखर उत्पादन - ५ (जे), आसवणी - ५ (जी) आणि १ (डी) वर्गात मोडत असून ऊस गाळप क्षमता - ५,०००.० टन प्रतिदिनपेक्षा जास्त असल्याने आणि आसवणी प्रकल्प १००.० किलो लिटर प्रति दिनपेक्षा जास्त असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (TOR) प्रदान

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE

करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १०-१०-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक १२-१०-२०२३ रोजी प्रदान केली. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प परिघाच्या १० कि.मी. अंतरापर्यंतचे सर्व बेसलाईन सर्वेक्षण करुन प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन शासनास सादर केलेला आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव, महाराष्ट्र यांच्या गट नं.६७,६८,६९,७०,८०,८३,८४ व ८५ (६७/१, ६७/२/३, ६८/१, ६८/२/१, ६८/२/२, ६८/३, ६८/४, ६९/१, ६९/२, ६९/३, ६९/४, ६९/५, ६९/६, ७०/२, ८०/४, ८३/९१/१, ८४/९२/२, ८४/९२/३, ८५/९३/१ व ८५/९३/२, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव - ४१३ ६०८, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार क्षमता ६,०००.० टन प्रतिदिन वरुन १२,०००.० टन प्रतिदिन पर्यत वाढविणे

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV

(६,०००.० टन प्रतिदिन वाढ), सहनिर्मिती वीज/उर्जा प्रकल्प ३०.० मेगावॅट वरुन ३७.० मेगावॅट पर्यत वाढविणे (७.० मेगावॅट वाढ) आणि प्रस्तावित ऊसाचा रस/मोलॅसिसवर आधारित ४००.० किलोलिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी प्रतिदिन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रितसर अर्ज दिनांक १४-०६-२०२४ रोजी सादर केला.

सहसंचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक २२-०७-२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार , दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११. ३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV



Scanned with OKEN Scanner

कार्यालयीन आदेश क्रं. ई-१४८/२०२४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०८२६-एफटीएस ०३४६ दिनांक २६-०८-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, धाराशिव, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी – प्रादेशिक अधिकारी-छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर, | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ, छत्रपती संभाजी नगर एडिशन, यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया, छत्रपती संभाजी नगर एडिशन यात इंग्रजीत दिनांक ०९ ऑगस्ट, २०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE • DHARASHIV •



Scanned with OKEN Scanner

अवलोकनार्थ  खालील अधिसूचित (notified) शासकीय कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होता -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव, तालुका व जिल्हा - धाराशिव

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव, तालुका व जिल्हा - धाराशिव

४) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, धाराशिव, तालुका व जिल्हा - धाराशिव,

५) तहसीलदार, तहसील  कार्यालय-लोहारा, तालुका-लोहारा, जिल्हा - धाराशिव,

६) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय - लोहारा खुर्द व खेड, लोहारा (बुद्रुक), मालेगाव, माकणी, धानोरी, करजगाव, नागोर, लोहटा, हिप्परगा, वडगाव, वडगाववाडी, वडाचा तांडा, मोघा (बुद्रुक), मोघा(खुर्द), बेलवाडी, शिवकरवाडी, तावशीगड, बेंडकळ, मर्डी, काष्टी (बुद्रुक), काष्टी (खुर्द), कानेगाव, भातांगळी, नागराळ, विसालपूर पांढरी, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव,

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE • DHARASHIV •



Scanned with OKEN Scanner

७) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

८) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, शीव (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

९) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, पर्यावरण भवन, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल शेजारी, जालना रस्ता, छत्रपती संभाजी नगर - ४३१ २१०,

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं.पी-१०, लातूर जिल्हा उद्योग समुह इमारत, एम.आय.डी.सी. लातूर - ४१३ ५३१.

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

उपरोक्त प्रकल्पाविषयी आजतागायत उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना ०३ सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE • DHARASHIV •

Scanned with OKEN Scanner

संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, बैठकीचे इतिवृत, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV

परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले,

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव, महाराष्ट्र यांच्या गट नं.६७,६८,६९,७०,८०,८३,८४ व ८५ (६७/१, ६७/२/३, ६८/१, ६८/२/१, ६८/२/२, ६८/३, ६८/४, ६९/१, ६९/२, ६९/३, ६९/४, ६९/५, ६९/६, ७०/२, ८०/४, ८३/९१/१, ८४/९२/२, ८४/९२/३, ८५/९३/१ व ८५/९३/२, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव - ४१३ ६०८, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार क्षमता ६,०००.० टन प्रतिदिन वरुन १२,०००.० टन प्रतिदिन पर्यत वाढविणे (६,०००.० टन प्रतिदिन वाढ), सहनिर्मिती वीज/उर्जा प्रकल्प ३०.० मेगावॅट वरुन ३७.०

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV



Scanned with OKEN Scanner

मेगावॅट पर्यत वाढविणे (७.० मेगावॅट वाढ) आणि प्रस्तावित ऊसाचा रस/मोलॅसिसवर आधारित ४००.० किलोलिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रितसर अर्ज दिनांक १४-०६-२०२४ रोजी सादर केला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए - साखर उत्पादन - ५ (जे), आसवणी - ५ (जी) आणि १ (डी) वर्गात गोडत असून ऊस गाळप क्षमता - ५,०००.० टन प्रतिदिनपेक्षा जास्त असल्याने आणि आसवणी प्रकल्प १००.० किलो लिटर प्रति दिनपेक्षा जास्त असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सविस्तर माहिती दिली. प्रस्तावित प्रकल्पातील ऊस गाळप क्षमता विस्तारीकरण, सहवीजनिर्मिती

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV

Scanned with OKEN Scanner

वीज विस्तारिकरण तसेच नविन आसवणी प्रकल्प उभारणीसाठी एकूण किंमत ४१९.०५ कोटी असून पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी (EMP) भांडवली खर्च रुपये ५३.०९ कोटी, तर आवर्ती खर्च रुपये ९३.५ लाख/वार्षिक येईल. साखर कारखाना १४० दिवस, तर आसवणी प्रकल्प हा ३३० दिवस कार्यान्वित राहिल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा झेडएलडी - शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असून शेतक-यांच्या हिताचा प्रकल्प आहे. प्रस्तावित प्रकल्पात कुशल व अकुशल कामगारांची आवश्यकता असून प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात २०० व्यक्तींना, तर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ५०० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधि प्राप्त होईल. मात्र सदरहू विस्तारिकरण प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. हरितपट्टा विकसित करताना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार स्थानिक वृक्षप्रजाती, तसेच प्रामुख्याने प्रदूषण पातळी कमी करणा-या वनस्पती प्रजाती लावण्यास प्राधान्य देण्यात येईल.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE
DHARASHIV



Scanned with OKEN Scanner

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याची परवानगी देण्यात येत आहे. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते नोंदविण्यात यावेत.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न, सूचना, आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री पप्पू गुलाब राठोड, राहणार-आनंदनगर, तांडा खेड, पोस्ट-धानुरी, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव (४१३ ६०८) -**

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV

प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत जो घनकचरा निर्माण होईल, त्याचा परिसरावर काही दुष्परिणाम होईल का?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारा कचरा म्हणजे बगॅसपासून उत्पन्न होणारी राख. त्यात पोटॅशचे प्रमाण चांगले असल्याने परिसरातील शेतक-यांना शेतात खत (manure) म्हणून उपलब्ध करण्यात येईल. तसेच उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारे प्रेस मडवर प्रक्रिया केल्यास त्याचा खत म्हणून वापर करण्यात येऊ शकतो. यामध्ये कुठल्याही प्रकारचा घातक घटक नसल्याने परिसरात, शेतात कुठल्याही प्रकारचा दुष्परिणाम होणार नाही.

२) **<u>श्री गणेश राजेन्द्र रसाळ, मुक्काम पोस्ट-लोहारा खुर्द, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव - ४१३ ६०८-</u>**

कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेमुळे परिसरातील नागरिकांना आवाजाचा त्रास होईल काय?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत ध्वनी उत्पन्न होण्याचे स्त्रोत म्हणजे बॉयलरचा वापर

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV

(operation), ब्लोअर्स. त्यासाठी ध्वनि उत्पन्न होणा-या मशिन्ससाठी अत्याधुनिक ध्वनी प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी सर्व प्रक्रिया बंधिस्त जागेतच करण्यात येतील. तसेच ज्या विभागात ध्वनी निर्माण होतो, तेथे काम करणा-या कामगारांना ईअर प्लग्स आणि ईअर मग्स उपलब्ध करण्यात येतील. प्रकल्पात ध्वनीची पातळी ही शासनाने पारित केलेल्या मानकांप्रमाणेच (prescribed standard) असेल. त्यामुळे कारखान्याबाहेरील जवळील गावांना, कारखाना परिसरातील रहिवाशांना प्रकल्पातील आवाजाचा त्रास होणार नाही.

३) **<u>श्री संजय लक्ष्मण जाधव, मुक्काम पोस्ट-करजगाव, राहणार-माकणी, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव ४१३ ६०८-</u>**

प्रस्तावित प्रकल्पात किती झाडे लावण्यात येतील?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की अद्यापपावेतो कारखाना व्यवस्थापनाने १३,००० झाडे लावलेली आहेत. प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात १,३०० झाडे लावण्यात येतील.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV

**४) श्री शरद बालाजी पाटील, मुक्काम पोस्ट-धानुरी, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव - ४१३ ६०४ -**

प्रस्तावित प्रकल्पामुळे जल प्रदूषण होईल काय?

पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण - झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. साखर विभागात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेसाठी लागणा-या ताज्या पाण्याची गरज कमी होणार आहे.

त्याचप्रमाणे आसवणी प्रकल्पात उत्पन्न होणारा स्पेंट वॉश हा बॉयलरमध्ये इंधन म्हणून वापरण्यात येणार आहे. तसेच प्रोसेस कन्डेनसेट आणि स्पेंट लीस ह्यावर कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट (CPU) या सयंत्रणेत प्रक्रिया करुन परत आसवणी प्रकल्पात वापरण्यात येणार आहे. त्यामुळे कुठलेही प्रक्रिया केलेले सांडपाणी हे प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE • DHARASHIV •



Scanned with OKEN Scanner

५) **श्री मनिष होळकर,प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

प्रकल्पात $CO_2$ उत्सर्जन किती होईल व त्यावर प्रक्रिया करण्यासाठी कोणत्या कायमस्वरुपी योजना प्रस्तावित आहेत? प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की उत्पादन प्रकियेत साधारणपणे ३२४.० घनमीटर $CO_2$ चे उत्सर्जन होईल. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या निर्देशांनुसार $CO_2$ स्क्रब करुन त्याचे बॉटलिंग करण्यात येणार आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की कारखान्याचे ४८० टीपीडीचे विस्तारिकरण प्रस्तावित आहे. जर आपण प्रेस मडपासून बायोगॅस प्रकल्प उभारला, तर साधारणतः ३५.० किलो मेट्रीक टन बायोगॅस तयार होईल. त्या प्रकल्पास शासनाचे ३३% अनुदान देण्यात येते. Buy-back योजनेमुळे प्रकल्पास त्याचा चांगला आर्थिक

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV

फायदा होऊ शकतो. सदस्य यांनी पुढे सूचना केली की प्रकल्प उत्पादनात उत्पन्न होणारी लिक्विड स्लरी (Liquid Slurry) ही शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की भविष्यात बायो-गॅस उभारणीचा आमचा मानस आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की अतिशय सुंदर व प्रकल्पाच्या हिताची सूचना दिलेली आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE DHARASHIV



Scanned with OKEN Scanner

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे आपण प्रकल्प प्रवर्तक मे. लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड, मुक्काम पोस्ट-लोहारा (खुर्द) व खेड, तालुका-लोहारा, जिल्हा-धाराशिव यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार क्षमता ६,०००.० टन प्रतिदिन वरुन १२,०००.० टन प्रतिदिन पर्यत वाढविणे, सहनिर्मिती वीज/उर्जा प्रकल्प ३०.० मेगावॅट वरुन ३७.० मेगावॅट पर्यत वाढविणे) आणि प्रस्तावित ऊसाचा रस/मोलॅसिसवर आधारित ४००.० किलोलिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीसाठी एकत्र जमलेलो आहोत. प्रकल्पाचे सादरीकरण प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी केलेले आहे. त्यात त्यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी संपुर्ण माहिती दिलेली आहे. स्थानिकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना उपस्थित केल्या व त्यास प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE • DHARASHIV •

या सर्वांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल व ते इतिवृत्त केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप; टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे परत आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE
DHARASHIV



Scanned with OKEN Scanner

प्राप्त झालेल्या ०३ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| होळकर | |
| **(परमेश्वर व्ही. कांबळे)** | **(मनिष होळकर)** |
| आयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, |
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, |
| लातूर | छत्रपती संभाजी नगर |

Sub-Regional Office, M.P.C. Board - LATUR

Regional Officer
Maharashtra Pollution Control B
Chhatrapati Sambhajinaga

**(सौ. शोभा जाधव)**
अध्यक्षा
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,धाराशिव,
जिल्हा-धाराशिव

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE • DHARASHIV •



Scanned with OKEN Scanner